| MHK0170000482008 | नियमित दिवाणी दावा ६/२००८<br>शिवाजी ज्ञानू घाटगे<br>वि.<br>आनंदा शंकर उगळे |
|---|---|

# नि. १६९ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी कागदपत्रांना निशाणी देण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे.

३. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, वादी यांनी सदरचा दावा हा कब्जा मागणीसाठी तसेच कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीतर्फे दावा मिळकती बाबतची काही कागदपत्रे दाखल केलेली आहे. तसेच प्रतिवादी तर्फे काही कागदपत्रे दाखल करण्यात आलेली आहे. प्रतिवादी तर्फे झालेल्या तोंडी पुराव्याच्या अनुषंगाने जी कागदपत्रे न्यायदानास आवश्यक आहे ती कागदपत्रे वादी दाखल करत आहेत. सदरची कागदपत्रे ही सार्वजनिक दस्तऐवज आहेत. तसेच सदर कागदपत्रांचा चौकशी कामी पुराव्यामध्ये लेखी उल्लेख झालेला आहे. त्यामुळे सदर कागदपत्रांना निशाणी देणे अत्यंत गरजेचे आहे. अंतिमतः वादीतर्फे वकील यांनी सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, मुळातच वादी यांनी दाखल केलेली सदरची कागदपत्रे दावा हा अंतिम युक्तीवादावर असताना हजर केलेली आहे. मुळातच वादी यांचा पुरावा केव्हाच संपलेला आहे. त्यामुळे सदर कागदपत्रे हजर

करण्याची आता कोणतीही स्टेज नाही. तसेच वादी यांनी दाखल केलेली कागदपत्रे ही कायद्यानुसार रिलेव्हंन्ट नाहीत. सदर कागदपत्रे वादी यास आता दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. तसेच सदर कागदपत्रांना कोणत्याही प्रकारे निशाणी देता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणे अत्यंत गरजेचे आहे. अंतिमतः प्रतिवादीतर्फे वकील यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

५. वादी यांचा अर्ज, प्रतिवादी यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता ही गोष्ट दिसून येते की, सदरचा दावा हा अंतिम युक्तिवाद होऊन प्रलंबित होता. मुळातच सदर कामी वादी यांनी नि.१२६ येथे पुरशीस दाखल करून बंद केलेला आहे. तसेच त्यानंतर प्रतिवादी यांनी नि. १६७ येथे पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा हा बंद केलेला आहे. त्यामुळे एकंदरीतच अशा परिस्थितीत वादी यांना केवळ न्याय हितास्तव कागदपत्रे दाखल करण्याची संधी देणे योग्य होईल असे वाटते. मात्र त्याचवेळी सदर कागदपत्रे ही वादी यांनी या कामी आतापर्यंत का दाखल केलेली नाहीत याचे कोणतेही स्पष्टीकरण दिसून येत नाही. त्यामुळे सदर कामी झालेला विलंब हा कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष करता येणार नाही.

७. तसेच सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर कागदपत्रांमधील अनुक्रमांक १ ते ७ ही कागदपत्रे सातबारा उतारे तसेच फेरफार उतारे दिसून येत आहेत. अनुक्रमांक ८ चा कागद हे नोंदणीकृत खरेदीपत्र दिसून येत आहे. कागदपत्रांमधील अनुक्रमांक ९ ते ३९ ही कागदपत्रे सातबारा उतारे तसेच उपविभागीय अधिकारी यांच्याकडील सहिसूद नक्कला दिसून येत आहेत. तसेच अनुक्रमांक ४० येथील कागद ही झेरॉक्स प्रत दिसून येत आहे. तसेच अनुक्रमांक ४१ वरील कागदपत्र हे खरेदीपत्र

दिसून येत आहे. अनुक्रमांक ४२ व ४३ येथील कागदपत्रे हे सातबारा उताऱ्यांच्या सहीसूद नक्कला दिसून येत आहे.

८. एकंदरीतच सदर कागदपत्रांच्या अनुषंगाने मुळातच अनुक्रमांक १ ते ७ ही कागदपत्रे पाहिली असता त्या सहीसूद नक्कला दिसून येत आहेत. त्यामुळे त्यांना निशाणी देणे योग्य होईल असे वाटते.

९. अनुक्रमांक ८ वरील कागदपत्र हे खरेदीपत्र आहे.त्यामुळे ते केवळ सहीसूद नक्कल आहे या कारणासाठी त्याला निशाणी देता येणार नाही. सदर अनुषंगाने वादी यांनी खरेदीपत्र शाबित होणे करिता पुरावा दाखल करणे योग्य होईल असे वाटते.

१०. अनुक्रमांक ९ ते ३९ ही कागदपत्रे सातबारा उतारे तसेच इतर कामकाजातील सहीसूद नक्कला दिसून येत आहे. त्यामुळे त्यांना निशाणी देणे योग्य होईल असे वाटते.

११. अनुक्रमांक ४० येथे दाखल करण्यात आलेला कागद हा झेरॉक्स प्रत आहे. त्यामुळे त्याला निशाणी देणे योग्य होणार नाही असे वाटते.

१२. अनुक्रमांक ४१ वरील कागदपत्र हे खरेदीपत्र आहे. केवळ सहीसूद नक्कल आहे या कारणासाठी त्याला निशाणी देता येणार नाही. सदर अनुषंगाने वादी यांनी खरेदीपत्र शाबित होणे करिता पुरावा दाखल करणे योग्य होईल असे वाटते.

१३. अनुक्रमांक ४२ व ४३ वरील कागदपत्र हे सातबारा उतारे सहीसूद नक्कल दिसून येत आहेत. त्यामुळे त्यांना निशाणी देणे योग्य होईल असे वाटते.

१४. वरील सर्व कारणमीमांसासेचा विचार करता एकंदरीतच वादी यांचा अर्ज अंशत मंजूर करणे योग्य होईल असे वाटते. मात्र त्याचवेळी झालेला विलंब हा कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष करता येणार नाही. सबब मी पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१. वादी यांचा निशाणी १६९ वरील अर्ज प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/– देण्याच्या अटीवर अंशतः मंजूर करण्यात आला आहे.**

**२. अनुक्रमांक १ ते ७ यांना नि. १७३ ते १७९ तसेच अ. क्र. ९ ते ३९ यांना नि. १८० ते नि. २१० तसेच अ. क्र. ४२ व ४३ येथे दाखल असलेल्या कागदपत्रांना नि. २११ व २१२ देण्यात येत आहे.**

सही/–
**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

पन्हाळा
दि. २१.०४.२०२६